Shri Shivaji Education Society, Amravati's
डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती.

# Dr. Panjabrao alias Bhausaheb Deshmukh Memorial Medical College

Shivaji Nagar, Amravati - 444 603
Phone : 0721- 2552353 / 2662323/2665545/ Fax : 0721 - 2552353
E-mail : drpdmmc2007@rediffmail.com / Web : www.pdmmc.com

Dr.P.R.Somwanshi
Dean

No.PDMMC/Est/ 4229 /2018 Date : 3.7.2018

प्रति,
प्राचार्य,
डॉ.पंजाबराव देशमुख नर्सिंग इन्स्टिट्यूट,
अमरावती.

विषय :- डॉ.पंजाबराव देशमुख रूग्णालया मार्फत राबविल्या जाणा-या स्वास्थ्य सेवा योजनेमध्ये महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी सहभागी करून घेण्याबाबत.

संदर्भ :- मा.अध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती यांचे पत्र क्रमांक शि.शि.स./२/१२७/२०१८, दि. २८.६.१८

महोदय/महोदया,

डॉ.पंजाबराव देशमुख रूग्णालयाद्वारे कार्यान्वित कौटुंबिक स्वास्थ्य सेवा योजना संस्थेच्या कर्मचा-यांसाठी राबविण्याचा धोरणात्मक निर्णय संस्थेने घेतला आहे. या योजनेत कर्मचा-यांच्या कुटुंबाला विविध तपासणी शुल्क दरात ५०% सुट देण्यात येते. कुटुंबात कर्मचारी, त्यांची/त्यांचे -पत्नी/पती/आई,वडिल/अविवाहित मुलगा व मुलगी यांचा समावेश असतो. या योजनेअंतर्गत बाह्यरूग्ण विभागामध्ये तपासणी करिता येणा-या सदस्यांना ब्लडशुगर (फास्टींग व पोस्टमिल), सी.बी.सी., युरीन रूटीन, ई.सी.जी., लीपीड प्रोफाईल या चाचण्या विनामुल्य करण्यात येईल व इतर चाचण्यांकरीता रूग्णालयाने ठरविलेले शुल्क भरावे लागेल. तसेच अंतररूग्ण विभागामध्ये भरती असलेल्या कर्मचारी व त्यांचेवर अवलंबुन असलेल्या कुटुंबातिल सदस्यांना औषधी व्यतिरिक्त रूग्णालयाचे बिलामध्ये ५०% सवलत देण्यात येते. या योजनेत **C.T. Scan/ MRI** चा समावेश नाही.

सदर योजनेची माहिती आपल्या विभागाच्या अधिनस्थ सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना देवून त्यांचा सहभाग सोबत जोडलेल्या प्रपत्र-'अ' नुसार नोंदवावयाचा आहे. कौटुंबिक स्वास्थ्य सेवा योजनेत सहभागी होण्यासाठी ज्यांचा एकत्रित पगार १ लाख पेक्षा जास्त आहे त्यांना वार्षिक शुल्क रूपये १०००/- ( दरमाह ८४ रूपये), ज्यांचा एकत्रित पगार ५० हजार ते १ लाख पर्यंत आहे त्यांना वार्षिक शुल्क रूपये ७५०/-( दरमाह ६३ रूपये) व ज्यांचा एकत्रित पगार ५० हजार पर्यंत आहे त्यांना रूपये ५००/-( दरमाह ४२ रूपये) आकारण्यात येते.

उपरोक्त स्वास्थ्य सेवा योजना दिनांक १ ऑगष्ट, २०१८ पासून कार्यान्वित होत असल्याने सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांची प्रपत्रातील माहिती या कार्यालयास दिनांक २० जुलै २०१८ पर्यंत [illegible] सादर करण्यासाठी विनंती करण्यात येत आहे.

सहपत्र :- प्रपत्र-'अ'

आपले,

( डॉ.व्ही.डी.खानंदे )
प्रभारी, स्वा.से.यो.

( डॉ.व्ही.एन.लचणकर )
वैद्यकीय अधिक्षक

( डॉ.पी.आर.सोमवंशी )
अधिष्ठाता

श्री शिवाजी शिक्षण संस्था

जा.क्र.शि.शि.स./ ३१/३२२८/२२/१८

दिनांक : ३१/८/१८

प्रति,
प्राचार्य,
डॉ.पंजाबराव देशमुख नर्सिंग इन्स्टिटयूट,
अमरावती.

विषय :- डॉ.पंजाबराव देशमुख रूग्णालया मार्फत राबविल्या जाणा-या स्वास्थ सेवा योजनेमध्ये आपले महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांना सहभागी करून घेण्यासंबधीची माहिती व शुल्क पाठविणेबाबत.

संदर्भ :-
१) मा.अध्यक्ष यांचे संस्था अंतर्गत अमरावती शहरातील सर्व शाळा/महाविद्यालयांना दिलेले पत्र क्रमांक शि.शि.स./ १/१३७/२०१८, दिनांक २८.६.२०१८
२) श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीच्या कार्यकारी परिषदेची सभा क्रं.१०, दिनांक १९.७.२०१८ रोजीच्या सभेत मंजूर झालेला ठराव क्रमांक ५४.
३) संस्था प्रमुखांची मा. अध्यक्ष यांनी बोलाविलेली बैठक, दिनांक २७.८.२०१८.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भात विषयाचे अनुषंगाने डॉ.पंजाबराव देशमुख रूग्णालयाव्दारे कार्यान्वित कौटुंबिक स्वास्थ सेवा योजना संस्थेच्या कर्मचा-यांसाठी राबविण्याचा धोरणात्मक निर्णय संस्थेने घेतला आहे. या योजनेत कर्मचा-यांच्या कुटुंबाला विविध तपासणी शुल्क दरात ५०% सुट देण्यात येते. कुटुंबात कर्मचारी, त्यांची/त्यांचे -पत्नी/पती/आई,वडिल/अविवाहिक मुलगा व मुलगी यांचा समावेश असतो. या योजनेअंतर्गत बाह्यरूग्ण विभागामध्ये तपासणी करीता येणा-या सदस्यांना ब्लडशुगर (फास्टींग व पोस्टमिल), सी.बी.सी., युरीन रूटीन, ई.सी.जी., लीपीड प्रोफाईल या चाचण्या विनामुल्य करण्यात येईल व इतर चाचण्यांकरीता रूग्णालयाने ठरविलेले शुल्क भरावे लागेल. तसेच आंतररूग्ण विभागामध्ये भरती असलेल्या कर्मचारी व त्यांचेवर अवलंबुन असलेल्या कुटुंबातील सदस्यांना औषधी व्यतिरिक्त रूग्णालयाचे बिलामध्ये ५०% सवलत देण्यात येते. या योजनेत **C.T. Scan, MRI** चा समावेश नाही.

कौटुंबिक स्वास्थ सेवा योजनेत सहभागी होण्यासाठी ज्यांचा एकत्रित पगार १ लाख पेक्षा जास्त आहे त्यांना वार्षिक शुल्क रूपये १०००/- ( दरमाह ८४ रूपये), ज्यांचा एकत्रित पगार ५० हजार ते १ लाख पर्यंत आहे त्यांना वार्षिक शुल्क रूपये ७५०/- (दरमाह ६३ रूपये) व ज्यांचा एकत्रित पगार ५० हजार पर्यंत आहे त्यांना रूपये ५००/-( दरमाह ४२ रूपये) आकारण्यात येते.

मा. अध्यक्ष यांनी संस्था प्रमुखांच्या दिनांक २७.८.२०१८ च्या बैठकीत सुचित केल्याप्रमाणे आपल्या अधिनस्थ सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांची माहिती तातडीने अधिष्ठाता, डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती यांचेकडे पाठवावी. तसेच कर्मचाऱ्यांची माहे ऑगस्टची वर्गणी व विद्यार्थ्यांचे वार्षिक शुल्क तातडीने **'सचिव, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती'** यांच्या नावाच्या धनाकर्षा व्दारे या कार्यालयाला पाठवावा ही विनंती.

सचिव,
श्री शिवाजी शिक्षण संस्था,
अमरावती

प्रतिलीपी माहितीस्तव सादर :-
१) मा.अध्यक्ष,श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती.
२) मा.कोषाध्यक्ष,श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती.

प्रतिलीपी :-
अधिष्ठाता,डॉ.पं.दे.स्मृ.वैद्यकीय महाविद्यालय,अमरावती.

Dr. Panjabrao Deshmukh
Nursing Institute, Amravati.
Inward No.........
Date.........
Sign.........

Shri Shivaji Education Society,Amravati's
डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती.
# Dr. Panjabrao alias Bhausaheb Deshmukh Memorial Medical College
Shivaji Nagar, Amravati - 444 603
Phone : 0721- 2552353 / 2662323/2665545/ Fax : 0721 - 2552353
E-mail : drpdmmc2007@rediffmail.com / Web : www.pdmmc.com

Dr.P.R.Somwanshi
Dean

No.PDMMC/Est/ ६२८ /2019 Date : 17.01.2019

प्रति,
प्राचार्य,
डॉ.पंजाबराव देशमुख नर्सिंग इन्स्टिटयूट,
अमरावती.

विषय :- श्री शिवाजी शिक्षण संस्थेव्दारा संचालित डॉ.पंजाबराव देशमुख रूग्णालया मार्फत राबविल्या जाणा-या स्वास्थ सेवा योजनेचे कौटुंबिक कार्डस् पाठविणेबाबत.

संदर्भ :- आपले कार्यालयाचे पत्र क्रमांक १४४/२०१९, दिनांक १६.१.२०१९

महोदय/महोदया,

वरिल संदर्भांकीत पत्रांचे अनुषंगाने आपले महाविद्यालयातील कार्यरत एकूण ४७ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे कुटुंब स्वास्थ सेवा योजना कार्डस् यापत्रासोबत पाठवित आहो. कृपया ते संपुर्ण भरून आपल्या स्वाक्षरीनिशी या महाविद्यालयाचे डॉ.व्ही.डी.खानंदे (भ्रमणध्वनी क्रमांक ९८५०३६२२४४) यांचेकडे पुढील कार्यवाहीस्तव सादर करण्याविषयी संबधितांना सुचीत करावे.

सहपत्र :- कुटुंब स्वास्थ सेवा योजना कार्डस् - एकूण - ४७

अधिष्ठाता,
डॉ.पं.दे.स्मृ.वैद्यकीय महाविद्यालय,
अमरावती

प्रतिलीपी माहिती व कार्यवाहीसाठी :-
डॉ.व्ही.डी.खानंदे, कम्युनीटी मेडीसीन विभाग.